# नागपूर महानगरपालिका, नागपूर

## (जनसंपर्क विभाग)

**प्रसिद्धी पत्रक** **नागपूर, दि. १२ ऑक्टोबर २०१९**

# कामात निष्काळजीपणा करणाऱ्या कंत्राटदार व अधिकाऱ्यांवर कारवाई करा - आयुक्त

## समन्वयन बैठकीत सर्व विभागांना निर्देश : शहरातील खड्डे दुरूस्तीचा घेतला आढावा

**नागपूर,ता.१२.** शहरातील खड्डे दुरूस्ती संदर्भात समन्वयन समितीच्या मागील बैठकीमध्ये सात दिवसात शहरातील खड्डे बुजविण्याचे आदेश आयुक्त अभिजीत बांगर यांनी दिले होते. दिलेल्या आदेशाची काय प्रगती आहे, याचा आढावा घेण्यासाठी शनिवारी समन्वयन समितीची दुसरी बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीमध्ये आढावा घेताना समाधानकारक स्थिती न दिसून आल्याने आयुक्तांनी नाराजी व्यक्त

करत कामात निष्काळजीपणा करणाऱ्या कंत्राटदारांवर व अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याचे निर्देश सर्व विभागांना दिले.

नागपूर शहरांमध्ये शासकीय यंत्रणेसंदर्भातील खड्डे दुरूस्ती संदर्भात समन्वयन समिती गठीत करण्यात आली असून या समितीची दुसरी बैठक आयुक्त अभिजीत बांगर यांच्या अध्यक्षतेखाली शनिवारी (ता.१२) मनपा मुख्यालयाच्या छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय इमारतीमध्ये आयोजित करण्यात आली. यावेळी मनपा आयुक्त अभिजीत बांगर यांच्यासह मनपा मुख्य अभियंता उल्हास देबडवार, समितीचे सदस्य सचिव मनपा अधीक्षक अभियंता मनोज तालेवार, नागपूर पोलिस उपायुक्त (वाहतूक) चिन्मय पंडित, एनएमआरसीएलचे प्रकल्प संचालक,सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता, नागपूर सुधार प्रन्यासचे अधीक्षक अभियंता, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणचे प्रकल्प संचालक, अधीक्षक अभियंता, एमएसइडीसीएल, मनपा जलप्रदाय, विद्युत, हॉटमिक्सचे कार्यकारी अभियंता प्रामुख्याने उपस्थित होते.

नागपूर शहरात विविध शासकीय यंत्रणेच्या मालकीचे रस्ते असून काही रस्त्यांवर विविध यंत्रणेद्वारे मोठ्या प्रकल्पांची कामे सुरू आहेत. या कामांमुळे ठिकठिकाणी खड्डे करण्यात येत असतात. या कामांच्या निर्मिती साठी अवजड यंत्रसामुग्री व साहित्य रस्त्यावर असते जेणेकरून वाहतूकीला अडथळा निर्माण होतो. याकामाचा समन्वय साधण्यासाठी ही समिती गठीत करण्यात आली आहे.

सर्व शासकीय यंत्रणेच्या विभागाच्या अधिकाऱ्यांनी स्वतः रस्त्यावर फिरून कुठे खड्डे दिसून येत असेल तर संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना याबाबत अवगत करावे, यासंबंधी आता हलगर्जीपणा आणि निष्काळजीपणा चालणार नाही, असे निर्देश आयुक्त अभिजीत बांगर यांनी दिले. उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार भादंवि कलम २८३ अन्वये रस्ता जर वापरण्यायोग्य नसेल आणि त्यारस्त्यावर जर अपघात झाला तर संबंधित कंत्राटदारावर फौजदारी गुन्हा नोंदविला जाणार आहे. जर कंत्राटदारावर गुन्हा नोंदविला नाही तर भादंवि कलम २१७ अन्वये संबंधित अधिकाऱ्यावर जबाबदारी निश्चित करून त्यांच्यावर गुन्हा नोंदविला जाणार असल्याची माहिती आयुक्तांनी यावेळी दिली.

शहरात सुरू असणाऱ्या विविध कामांचा आढावा त्यांनी बैठकीत घेतला. मागील बैठकीत सर्व विभागांना त्यांच्या अखत्यारित असेलेल्या रस्त्यांची यादी देण्यात आली होती. परंतु त्यापैकी काही रस्त्यांवरील खड्ड्यांची डागडूजी झाली. परंतु अद्यापही अन्य रस्त्यांवरील खड्डे दुरूस्त करण्यात आले नसल्याचे आयुक्तांनी सांगितले. यामध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारित असलेले मानेवाडा रोड, म्हाळगीनगर ते पिपळा फाटा, विमानतळ ते वर्धा रोड, नागपूर मेट्रो रेल्वेच्या अखत्यारित असलेले रस्त्यांपैकी ) वर्धा रोड - विमानतळ ते आरबीआय चौक कामठी रोड - ऑटीमोटिव्ह चौक ते आरबीआय चौक, भंडारा रोड - भंडारा नाका ते संत तुकाराम चौक ते प्रजापती चौक, सेंट्रल ॲव्हेन्यू - प्रजापती चौक ते रामझुला, कॉटन मार्केट रोड - रामझुला ते कॉटन मार्केट चौक, बर्डी रोड - कॉटन मार्केट चौक ते बर्डी मेट्रो स्टेशन ते व्हेरायटी चौक, उत्तर अंबाझरी मार्ग - सीताबर्डी मेट्रो रेल्वे स्टेशन ते अंबाझरी टी पॉईंट, हिंगणा रोड -

अंबाझरी टीपॉईंट ते सुभाष नगर स्टेशन ते हिंगणा नाका, हम्पयार्ड रस्ता - धंतोली पुलापासून अजनी रेल्वे स्टेशन या रस्त्यावर काही ठिकाणी मोठे खड्डे आहे, ते त्वरित बुजविण्यात यावे, असे निर्देश आयुक्तांनी दिले. मेट्रो रेल्वेची विकासकामे ही मोठ्या रस्त्यांवरच आहे. त्याठिकाणी त्यांचे बांधकाम सुरू असते अशा ठिकाणीवाहतूकीचा जोर अधिक असतो. त्यामुळे मेट्रोने जबाबदारीने काम करून रस्त्यातील खड्डे तातडीने बुजवावे असे निर्देश आयुक्त अभिजीत बांगर यांनी दिले. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या अखत्यारित असलेल्या रस्त्यांपैकी ऑटोमोटिव्ह चौक ते कामठी नाका चौक, उमरेड रोड ते उमरेड नाका चौक, अमरावती रोड ते वाडी नाका, एचबी टाऊन ते पारडी या रस्त्यावरील खड्डे बुजवून रस्ता दुरूस्त करण्याचे निर्देश आयुक्तांनी दिले. पारडी उड्डाण पूल - भंडारा नाका ते संत तुकाराम चौक ते रिंग रोडवरील एपीएमसी चौक, संत तुकाराम चौक ते प्रजापती चौक ते संघर्षनगर चौक रिंग रोड, काटोल रोड - एमएसईबी चौक ते छावणी चौक ते सखाराम चौक, भंडारा रोड - सीमेंट रस्त्याचे बांधकाम - सुनील हॉटेल ते पारडी नाका या रस्त्यांबद्दलचा आढावा आयुक्तांनी यावेळी बैठकीमध्ये घेतला. नागपूर सुधार प्रन्यासच्या अखत्यारित असलेल्या रस्त्यामंध्ये मनीष नगर भागातील मुख्य रस्ते, रिंग रोड पासून बेसा बेलतरोडी भागाकडे जाणारे मुख्य रस्ते, कळमना औद्योगिक क्षेत्रातील रस्ते ५७२ व १९०० अभिन्यासातील मनपास हस्तांतरित न झालेल्या अभिन्यासातील रस्ते गुंठेवारी अभिन्यास अंतर्गातील रस्ते यांचा समावेश असून याबाबतही बैठकीमध्ये चर्चा करण्यात आली. एमएसईडीसीएलच्या अखत्यारित असलेल्या रस्त्यांमध्ये अलंकार टॉकीज चौक ते आरपीटीएस रोड टी पॉईंट मार्गावरील रस्त्यांवर काही ठिकाणी बांधकाम साहित्य आढळून आलेले

दिसले. ते तातडीने काढण्यात यावे, असे निर्देश आयुक्तांनी दिले. व्हि.सीए चौक ते महाराजबाग पर्यंत, आरपीडीएस अंतर्गत परवानगी देण्यात आलेले दक्षिण पश्चिम क्षेत्रातील अंतर्गत रस्त्यांबाबत आढावा आयुक्तांनी घेतला.

सर्व विभागातील शाखा अभियंता, उपअभियंता, कनिष्ठ अभियंता, कार्यकारी अभियंता यांनी फिरून खड्डे बुजले की नाही, याची खातरजमा करावी, असेही आयुक्तांनी सांगितले. ओसिडब्लूने काम करताना सूचना फलक लावावे, याचप्रमाणे बॅरीगेटींगही करणे अनिवार्य असल्याचे आयुक्तांनी सांगितले.

नासुप्र क्षेत्रातील खड्डे हे नासुप्रच्या हॉटमिक्स विभागाने बुजविण्याचे निर्देश आयुक्त अभिजीत बांगर यांनी दिले. पूर्व व उत्तर भागातील खड्डे नासुप्रच्या हॉटमिक्स विभागाने करावे, त्याचे देयके मनपा करेल, असेही आयुक्त श्री.बांगर यांनी सांगितले. एमएसईडीसीएल विभागाने त्यांच्या विभागाद्वारे केबल टाकण्यासाठी केलेल खोदकाम सात दिवसाच्या आत दुरूस्त करण्यात यावे, असे निर्देश आयुक्त अभिजीत बांगर यांनी दिले. यानंतर खड्डे करण्यापूर्वी नागपूर महानगरपालिकेची परवानगी घेणे आवश्यक आहे. यासोबतच महापालिकेची परवानगी घेताना पोलिस विभाग (वाहतूक)ची परवानगी घेण्यात यावी, असेही निर्देश आयुक्तांनी सांगितले.

**एमएसईडीसीएलच्या कामाबद्दल तीव्र नाराजी व्यक्त करत कामे व्यवस्थित न केल्यास कारवाईचा ईशारा**

एमएसईडीसीएलच्या मार्फत शहरात विविध ठिकाणी कामे सुरू आहेत. यासाठी त्यांनी रस्त्यांवर खड्डे खोदले आहेत.परंतु काम करताना

त्यांचा निष्काळजीपणा दिसून येत असल्याने आयुक्तांनी नाराजी व्यक्त केली. कामे व्यवस्थित न केल्यास कारवाईचा ईशारा आयुक्त अभिजीत बांगर यांनी दिला. टेलीफोन एक्सचेंज चौकात केलेल्या कामांमध्ये मोठ्या प्रमाणावर त्रुटी आढळल्या होत्या. यानंतर असा प्रकार घडला तर कामे रद्द करण्यात येईल, अशी तंबी आयुक्तांनी दिली. बांधकाम करताना कुठेही बॅरीगेट्स नाही. सूचना फलकेही लावले नसल्याचे आढळून आल्याचे त्यांनी सांगितले. यानंतर मुदतीनंतर काम करताना दिसून आल्यास त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल, असा ईशारा आयुक्तांनी दिला. मुदत संपल्यांनतरही कामे सुरू असतील तर आधी मनपाची परवानगी घ्यावी, नंतर काम सुरू करण्याचे निर्देश त्यांनी उपस्थित अधिकाऱ्यांना दिले.